| MHPU01-017191-2025 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक | २१/१०/२०२४ |
| | नोंदणी दिनांक | ०७/११/२०२४ |
| | निर्णय दिनांक | १८/११/२०२५ |
| | कालावधी | १ वर्ष २८ दिवस |
| | **निशाणी नं.** | **१९** |

| | |
|---|---|
| | **अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पुणे यांचे न्यायालयात,**<br>**पिठासीन अधिकारी –**<br>श्री. अनिरुध्द सुभाष गांधी, अतिरीक्त सत्र न्यायाधीश |
| | निकाल दिनांक – १८/११/२०२५ |
| | विशेष सत्र खटला नं. १३०८/२०२४ |
| | **गु.र.नं. २२४/२०२४**<br>पोलीस स्टेशन – विश्रामबाग |
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे, विश्रामबाग** |
| तर्फे विधीज्ञ | श्री. अनिलकुमार वर्मा, सहायक सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | राजू श्रीरंग जागडे<br>वय – १९ वर्षे, धंदा – बसचालक<br>सध्या राहणार – १११५, रामनगर, हिंगणे खुर्द, माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे<br>कायम राहणार – आंबेड, ता. वेल्हे, जिल्हा पुणे |
| **तर्फे विधीज्ञ** | श्री डी.एस.शिरोळे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २०/०७/२०२४ ते २४/०८/२०२४ |
| प्रथम खबर नोंदविल्याचा दिनांक | २४/०८/२०२४ |
| दोषारोप पत्र दाखल केल्याचा दिनांक | २१/१०/२०२४ |

shoneekapoor.com

| | |
|---|---|
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०२/०१/२०२५ |
| पुरावा नोंदविणेस सुरुवात केल्याचा दिनांक | १२/११/२०२५ |
| न्यायनिर्णयास ठेवलेचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १८/११/२०२५ |
| शिक्षा दिली असल्यास त्याचा दिनांक | नाही. |

## आरोपीचा तपशील

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडलेचा दिनांक | दोषारोपाचा तपशील | दोषी किंवा निर्दोष | शिक्षेचा कालावधी | भा.ना.सु.सं. कलम ४६८ करीता अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजू श्रीरंग जागडे | २४/०८/२०२४ | ०३/०९/२०२४ | भा.न्या.सं. कलम ७८(२), आणि बा.अ. प्र. कायदा कलम १२ अन्वये | निर्दोष | -- | -- |

| | |
|---|---|
| दोषारोप : | भारतीय न्याय संहिताचे कलम ७८(२) आणि बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम १२ अन्वये |

## न्यायनिर्णय
**(दिनांक १८/११/२०२५)**

आरोपीवर भारतीय न्याय संहिताचे कलम ७८(२) आणि बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम १२ अन्वये खटला चालविण्यात आला.

सरकार पक्षाची केस थोडक्यात खालीलप्रमाणे –

२. दि.२४/०८/२०२४ रोजी फिर्यादी हीने पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदवली. ती सांगते की, पिडीता तिची मुलगी असून तिचे वय १३ वर्षे आहे. ती हुजूरपागा शाळेत इयत्ता १० वी मध्ये शिकते. पिडीता अभ्यासासाठी फिर्यादीचा मोबाइल वापरते.

३. फिर्यादी पुढे असे सांगते की, दि.२४/८/२०२४ रोजी रात्री १०.०० वा. तिने तिचा मोबाइल पाहिला. त्यावेळी मोबाइल मधील इन्स्टाग्राम पाहिले असता त्यामध्ये राजू जागडे नावाचे मुलाची लिखीत संभाषण पाहिले, त्यामध्ये पिडीता व त्या मुलाचे संभाषण आढळले. तिने तो मुलगा कोण आहे ते पाहण्यासाठी संभाषणाचे छायाचित्र घेतले व आशा पारगे मावशींना विचारले असता तो मुलगा शाळेच्या गाडीवर चालक आहे असे कळाले.

४. फिर्यादी पुढे असे सांगते की, दि.२४/८/२०४ रोजी सकाळी पिडीता शाळेत गेलयावर तिने व तिच्या पतीने शाळेच्या आवारात सदर मुलाचा शोध घेतला, तो मुलगा मिळून आला त्यामुळे ते त्याला मुख्याध्यापाकांकडे घेवून जात असतांना एका अनोळखी व्यक्तिने विचारल्यावरुन त्यांनी कारण सांगितले. त्या अनोळखी व्यक्तिने पोलीसांना फोन केला व तेवढयात मुख्याध्यापक तिथे आले. त्यांनी विचारपूस केली तेंव्हा फिर्यादीने त्यांना घटनेची माहिती दिली. मुख्याध्यापकांनी कारवाई करतो असे सांगितले. पोलीस तिथे आले. पोलीसांनी प्रकरणाची माहिती घेतली. फिर्यादीने पोलीस

ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेली. तिच्या तक्रारीवरुन पोलीसांनी आरोपी विरुध्द गुन्हा नोंदवला.

५. तपासी अधिकारी यांनी सदर गुन्ह्याचा तपास केला. त्यांनी आरोपीला अटक केली. घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. गुन्हयात वापरण्यात आलेला एक सॅमसंग कंपनीचा मोबाइल आरोपीकडून जप्ती पंचनाम्याने जप्त केला. फिर्यादीचे व पिडीतेचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम १८४ प्रमाणे न्यायालयाकडुन जबाब नोंदवून घेणेकामी पत्र लिहीले. साक्षीदारांचे तपास टिपण नोंदवले. आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा मिळुन आल्याने त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

६. आरोपीविरुध्द निशाणी ३ अन्वये दोषारोप निश्चित केला. आरोपीने त्याच्यावरील आरोप अमान्य केले व खटला चालवण्याची विनंती केली.

७. न्यायालयात खटला चालविण्यात आला. अभियोग पक्षातर्फे पुढीलप्रमाणे साक्षीदार तपासण्यात आले व दस्तऐवज शाबीत करण्यात आले. आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिताचे कलम ७८(२) आणि बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम १२ अन्वये प्रमाणे खटला चालविण्यात आला.

shoneekapoor.com

८. अ. अभियोग पक्षातर्फे तपासलेल्या साक्षीदारांची यादी

| सा.क्र. | निशाणी | साक्षीदारांचे नांव | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | ७ | ×××××× | फिर्यादी |
| २ | १२ | ×××××× | पिडीता |

९. अभियोग पक्षातर्फे शाबीत केलेल्या कागदपत्रांची यादी

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| १ | ८ | पिडीतेचे जन्म प्रमाणपत्र |
| २ | ९ | फिर्याद |
| ३ | १० | छापील एफआयआर |
| ४ | ११ | फिर्यादीचा न्यायालयात घेतलेला जबाब. |
| ५ | १२ | पिडीतेचा न्यायालयात घेतलेला जबाब. |

१०. बचाव पक्षाने मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| १ | १४ | घटनास्थळ पंचनामा |
| २ | १५ | अंगझडती पंचनामा |
| ३ | १६ | ससून रुग्णालयाचा केसपेपर |
| ४ | १७ | अटक पंचनामा |

बचाव पक्षातर्फे साक्षीदार, असल्यास :

| सा.क्र. | नांव | तपशील |
|---|---|---|
| -- | नाही | -- |

shoneekapoor.com

अ. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :

| सा.क्र. | नांव | तपशील |
|---|---|---|
| -- | नाही | -- |

ब. बचाव पक्षातर्फे दाखल कागदपत्राची यादी :

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

क. न्यायालयातर्फे निशाणी :

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

ड. भौतिक वस्तू :

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| -- | नाही | नाही |

११. अभियोग पक्षाने निशाणी १९ अन्वये पुरावा बंद केल्याची पुरसीस दाखल केली.

१२. अभियोग पक्षाचा पुरावा झालेनंतर आरोपीविरुध्द पुरावा न आल्याने त्याचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे निवेदन नोंदवले नाही.

१३. सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री.वर्मा व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.डी.एस.शिरोळे यांचा युक्तीवाद ऐकला.

shoneekapoor.com

१४. सरकार पक्षाची केस व एकंदरीत परिस्थिती विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत –

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दि.२९/७/२०२४ ते २४/८/२०२४ चे दरम्यान, लक्ष्मी रोड, पुणे येथे आरोपीने अल्पवयीन पिडीतेचा पाठलाग केला तसेच इन्स्टाग्रामचे माध्यमातून तिचेशी संवाद साधून तिचे जवळ येण्याचा प्रयत्न करुन त्याअन्वये भा.न्या.संहिताचे कलम ७८(२) प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले का ? | ..नाही. |
| २ | वर नमूद कालावधीत, वेळी व ठिकाणी आरोपीने, १८ वर्षाखालील अल्पवयीन पिडीतेचा लैंगिक छळ केला आणि त्याद्वारे त्याने बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम १२ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले का ? | ..नाही. |
| ३ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

### मुद्दा क्र. १ –

१५. आरोपीने भारतीय न्याय संहिता कलम ७८(२) प्रमाणे गुन्हा केला आहे असा त्यावर आरोप आहे. त्यामुळे सदर कलमाच्या तरतुदी पाहणे आवश्यक आहे.

shoneekapoor.com

**७८.** चोरुन पाठलाग करणे :

(१) जो कोणताही पुरुष –

(एक) एखाद्या स्त्रीचा चोरुन पाठलाग करील आणि अशा स्त्रीने परस्पर जवळीक साधावी म्हणून तिला उत्तेजन देण्यासाठी, त्या स्त्रीने इच्छा नसल्याचे स्पष्टपणे दर्शवले असून ही वारंवार तिच्याजवळ जाईल किंवा जवळ जाण्याचा प्रयत्न करील ; किंवा

(दोन) त्या स्त्रीच्या इंटरनेट, ई–मेल किंवा इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक साधनाच्या वापरावर बारीक लक्ष ठेवील, तो चोरुन पाठलाग करण्याचा अपराध करतो असे मानण्यात येईल.

परंतु असे की, जर त्याने पाठलाग केला होता –

(एक) गुन्हा घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी किंवा गुन्हयाचा तपास करण्यासाठी पाठलाग केला होता आणि ज्याच्यावर पाठलाग केल्याचा आरोप असेल त्या माणसाकडे गुन्हयाला प्रतिबंध करण्याची किंवा गुन्हयाचा तपास करण्याची जबाबदारी राज्याने सोपवली होती ; किंवा

(दोन) ते, कोणत्याही कायद्यान्वये किंवा एखाद्याने व्यक्तीने कोणत्याही कायद्यान्वये लादलेल्या कोणत्याही शर्तींचे किंवा आवश्यक बाबीचे अनुपालन म्हणून करण्यात आले होते ; किंवा

(तीन) विशिष्ट परीस्थितीत असे वर्तन वाजवी व न्याय्य होते. असे सिध्द केले तर, अशी वर्तणूक ही चोरुन पाठलाग या सदरात जमा होणार नाही.

shoneekapoor.com

१६. आरोपीने बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदयाचे कलम १२ प्रमाणे गुन्हा केला आहे असा त्यावर आरोप आहे. त्यामुळे सदर व्याख्येच्या तरतुदी पाहणे आवश्यक आहे.

**११.** एखाद्या व्यक्तीने बालकावर लैंगिक छळ केला असे म्हटले जाते जेव्हा अशी व्यक्ती लैंगिक हेतूने –

कोणताही शब्द उच्चारतो किंवा कोणताही आवाज काढतो, किंवा कोणताही हावभाव करतो किंवा शरीराचा कोणताही भाग अशा उद्देशाने दाखवतो की असा शब्द किंवा आवाज ऐकू येईल, किंवा असा देखावा, वस्तू किंवा शरीराचा भाग मुलाला दिसेल किंवा

मुलाला त्याचे शरीर किंवा त्याच्या शरीराचा कोणताही भाग अशा प्रकारे प्रदर्शित करायला लावतो की तो अशा व्यक्तीला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला दिसेल किंवा अश्लील हेतूने कोणत्याही स्वरूपात किंवा माध्यमात मुलाला कोणतीही वस्तू दाखवणे;

वारंवार किंवा सतत मुलाला थेट किंवा इलेक्ट्रॉनिक, डिजिटल किंवा इतर कोणत्याही माध्यमातून फसवणे, पाहणे किंवा संपर्क साधणे; किंवा

कोणत्याही प्रकारच्या माध्यमांमध्ये, इलेक्ट्रॉनिक, फिल्म किंवा डिजिटल किंवा इतर कोणत्याही माध्यमातून मुलाच्या शरीराच्या कोणत्याही भागाचे किंवा लैंगिक कृत्यात मुलाच्या सहभागाचे वास्तविक किंवा बनावट चित्रण वापरण्याची धमकी देणे; किंवा

पोर्नोग्राफीच्या उद्देशाने मुलाला मोहित करणे किंवा त्याचे समाधान देणे

shoneekapoor.com

१७. आरोपी हा पिडीतेशी आंतरजालच्या माध्यमातून मोबाइलवर संदेश पाठवत होता व त्याद्वारे पिडीतेचा ई–पाठलाग करीत होता असा आरोपीवर आरोप आहे. भारतीय न्याय संहिता कलम ७८ व बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ११ चे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर कलमान्वये गुन्हा सिध्द करतांना आरोपी हा पिडीतेचा चोरुन ई–पाठलाग करत होता ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मी पटलावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले.

१८. फिर्यादीचा पुरावा निशाणी ७ चे अवलोकन केले. तिने असे कथन केले आहे की, पिडीता तिची मुलगी आहे. दि.३०/३/२०१० ही पिडीतेची जन्मतारीख आहे. जन्म प्रमाणपत्र, निशाणी ८, तिच्या मुलीचे आहे. मागच्या वर्षी ती इयत्ता १० वी मध्ये हुजूरपागा शाळेत शिकत होती. आरोपी मुलीच्या शाळेत वाहनचालक म्हणून काम करत होता.

१९. फिर्यादीने पुढे असे कथन केले आहे की, दि.२३/८/२०२४ रोजी तिची मुलगी संध्याकाळी अभ्यास करत होती. जेवणासाठी तीने तिला आवाज दिला परंतु ती आली नाही म्हणून ती तिला पाहण्यासाठी गेली त्यावेळेस मुलगी मोबाइलवर संभाषण करत होती. तिने तिच्याकडे चौकशी केली त्यावेळेस तीने वाहनचालक राजू जागडे याच्यासोबत लिखीत संभाषण करत असल्याचे सांगितले.

२०. फिर्यादीने पुढे तिच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, त्यानंतर ती व तिचे पती मुलीच्या शाळेत गेले. तिथे आरोपीला पकडले. त्यांनी आरोपीला जाब विचारला. आजुबाजूला लोक जमा झाले. त्यापैकी काहींनी आरोपीला मारहाण केली व काहींनी पोलीसांना फोन करुन बोलवून घेतले. पोलीस तिथे आले व त्यांना विश्रामबाग पोलीस चौकीत घेवून गेले. तिथे तिने फिर्याद, निशाणी ९, दाखल केली. पूर्वी न्यायालयात तिचा जबाब, निशाणी ११, घेण्यात आला.

२१. उलटतपासा दरम्यान, तिची मुलगी फिर्यादीच्या मोबाइल वरुन लिखीत संभाषण करत होती हे तिने मान्य केले. तसेच फिर्यादीने तिला इंग्रजी येत नसल्याचे सांगितले. सदरच्या लिखीत संभाषणामध्ये कोणताही आक्षेपार्ह मजकूर नव्हता हे देखील फिर्यादीने मान्य केले. तसेच आरोपीने त्यांच्या मुलीशी संभाषण बंद करावे हे सांगण्याकरीता ते शाळेत गेले होते व कोणतीही तक्रार करण्याकरीता ते शाळेत गेले नव्हते असे फिर्यादीने मान्य केले. पुढे फिर्यादीने पोलीसांनी त्यांना सदरची तक्रार दाखल करावीच लागेल असा दबाव आणल्याने तिने तक्रार दाखल केल्याचे सांगितले.

२२. अभियोग पक्षाने पिडीतेला साक्षीदार क्र.२ म्हणून तपासले. तिचा पुरावा, निशाणी १२ चे अवलोकन केले. तिने असे कथन केले आहे की, आरोपीला ती ओळखते. तो तिच्या शाळेतील वाहनावर वाहनचालक म्हणून

काम करतो. ती तिच्या आईचा मोबाइल फोन वापरते. ती मागील वर्षी इयत्ता १० मध्ये हुजूरपागा शाळेत शिकत होती.

२३. पुढे पिडीतेनी तिच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, दि.२३/८/२०२४ रोजी रात्री ती आरोपीसोबत लिखीत संभाषण करत होती. तिचे वडील तिथे आले. त्यांनी तिच्या कडून फोन काढून घेतला व लिखीत संभाषणामधील मजकूर वाचला. दुस–या दिवशी तिचे आईवडील आरोपीला जाब विचारण्यासाठी शाळेत गेले. आरोपीने इन्स्टाग्रामवर हाय मजकूर पाठवला. नंतर ते एकमेकांशी बोलू लागले. लिखीत संभाषण ती तिच्या इच्छेने करत होती. या पूर्वी न्यायालयात तिचा जबाब, निशाणी १३, घेतला होता.

२४. उलट तपासा दरम्यान पिडीतेनी स्वतःच आरोपीला 'फ्रेंड रिक्वेस्ट' पाठवली होती हे मान्य केले आहे. तसेच त्यावेळेस ती कोण आहे हे आरोपीला माहित नव्हते, तिचे वय देखील त्याला माहित नव्हते हे तिने स्पष्टपणे मान्य केले.

२५. पिडीता व फिर्यादीचा एकंदरीत पुरावा पाहता असे दिसून येते की, घटनेच्या वेळेस पिडीता ही अल्पवयीन आहे याची आरोपीस माहिती नव्हती. पिडीतेनी स्वतः आरोपीला मैत्रीची मागणी केली होती. वरील दोन्ही कलमांच्या अनुषंगाने आरोपी हा पिडीतेचा वैयक्तिकरित्या अथवा आंतरजालाच्या माध्यमातून पाठलाग करत नव्हता. पिडीता आरोपीशी

बोलण्यास अनुत्सुक आहे किंवा पिडीतेनी आरोपीस बोलण्यास नकार दिला तरी देखील आरोपी तिच्याशी आंतरजालाच्या माध्यमातून संपर्क करण्याचा प्रयत्न करत होता अशी कोणतीही घटना घडलेली नाही. त्यामुळे सदरील कलमांना अपेक्षित असलेली आवश्यक बाब या ठिकाणी पूर्ण होत नाही. पिडीतेच्या मर्जीविरहीत आरोपी तिच्याशी संपर्क करत होता असा कोणताही पुरावा नाही. उलटपक्षी पिडीताच आरोपीशी संपर्क वाढवू इच्छीत होती व सदरील बाब तिच्या पालकांना मान्य नव्हती असे स्पष्टपणे दिसून येत आहे.

२६. बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदयान्वये कलम १२ खालील गुन्हा सिध्द करतांना त्यावेळेस आरोपीचा लैंगिक उद्देश होता ही बाब देखील गुन्हा सिध्द करणेकामी आवश्यक आहे. पिडीता तसेच फिर्यादीने आरोपीबरोबर झालेल्या लिखीत संभाषणामध्ये त्याने कोणतेही अश्लील भाषा वापरल्याचे किंवा लैंगिक सुखाची मागणी केल्याचे दोघीही सांगत नाही. उलटपक्षी सदरच्या संभाषणामध्ये कोणताही आक्षेपार्ह मजकूर नसल्याचे दोघीही मान्य करतात. त्याही पेक्षा पोलीसांनी सदरचा मोबाइल फोन जप्त केलेला असतांनाही सदरील लिखीत संभाषणाची प्रत पटलावर दाखल केली नाही व ती सिध्द देखील केलेली नाही. आरोपी हा पिडीतेशी लैंगिक हेतूने लिखीत संभाषण करत होता असे पिडीता व फिर्यादी सांगत नाही. या ही पेक्षा अभियोग पक्षाने सदरची बाब सिध्द केलेली नाही.

shreekapoor.com

२७. आरोपी विरुध्द नमूद केलेल्या गुन्हयाचे कोणत्याही आवश्यक बाबी उदाहरणार्थ चोरुन आंतरजालाच्या माध्यमातून पाठलाग करणे, अश्लील संभाषण करणे, पिडीतेच्या इच्छेविरहीत तिच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न करणे, लैंगिक हेतूने पिडीतेशी संपर्क करणे इ. अभियोग पक्ष सिध्द करु शकलेले नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष सोडण्यास पात्र आहे. वरील विवेचणानुसार मुद्या क्र. १ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो

## आदेश

१ आरोपी **राजू श्रीरंग जागडे** याची भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २५८(१) अन्वये त्याचे विरुध्द लावण्यात आलेल्या भारतीय न्याय संहिताचे कलम ७८(२) आणि बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदयाचे कलम १२ अन्वयेच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२ आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

३ जप्त मुद्देमाल, एक सॅमसंग कंपनीचा गॅलक्सी ए–३१ मॉडेलचा एअरटेल कंपनीचा सिम कार्ड असलेला मोबाइल फोन ज्याच्याकडून जप्त केला त्याला अपील कालावधीनंतर परत करण्यात यावा.

shoneekapoor.com

४ आरोपीने रक्कम रु. १५०००/- चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनकदबा संदर्भात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ अन्वये पुर्तता करावी.

५ येणेप्रमाणे न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by ANIRUDDHA SUBHASH GANDHI
Date: 2025.11.18 17:39:05 +0530

(अनिरुध्द सुलभा सुभाष गांधी)

दिनांक – १८/११/२०२५ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पुणे

shoneekapoor.com

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | : | Smt. B.R.Jakka, Grade – I. |
| Court Name | : | Shri A.S. Gandhi<br>Addl. Sessions Judge, Pune. |
| Date of Judgment /order | : | 18/11/2025 |
| Signed by P.O. on | : | 18/11/2025 |
| Uploaded on | : | 18/11/2025 |

shoneekapoor.com